**<u>प्रेसनोट</u>** दिनांक २२/०६/२०२४

## ‘‘सिनेअभिनेता श्री. अनुपम खेर यांच्या कार्यालयात चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक करून मालमत्ता हस्तगत केलेबाबत ’’

दि. १९/०६/२०२४ रोजी रात्रौ २१.०० वा. पासनु ते दि. २०/०६/२०२४ रोजी सकाळी ०९.३५ वा. च्या दरम्यान सिनेअभिनेता श्री. अनुपम खेर यांचे आझाद नगर नंबर ३, विरा देसाई रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई या बंद कार्यालयाचे दरवाजाचा कडी तोडून कोणीतरी अज्ञात इसमाने कार्यालयाच्या आतमध्ये प्रवेश करून १) रोख रक्कम रू. ४,१५,०००/-, २) दोन हजार रूपये किमंतीची लोखंडी तिजोरी, ३) एक हजार किमंतीची काळया रंगाची बॅग व ४) श्री. अनुपम खेर यांनी निर्मित केलेल्या फिल्मची रिल असणार एक हजार किंमतीची बॅग अशी एकूण रू. ४,१९,०००/- किमंतीची मालमत्ता चोरी केली अशी तक्रार श्री. प्रविण शांताराम पाटील यांनी दिल्याने अंबोली पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ६४७/२०२४ कलम ४५४, ४५७, ३८० भा.दं.वि. अन्वये तात्काळ गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाच्या आजपावेतो केलेल्या तपासावरून सदरचा गुन्हा हा आरोपी १) रफिक माजिद शेख, वय ३५ वर्षे, व २) मोहम्मद दिलशाद अब्दुल खान, वय ३० वर्षे यांनी केला असल्याचे तपासात निष्पन्न झालेने त्यांना दिनांक २१/०६/२०२४ रोजी अटक करण्यात आली असून त्याच्याकडून गुन्ह्यात चोरीस गेलेली १) रोख रक्कम रू. ३४,०००/- , २) फिल्मची रिल, व ३) दोन हजार रूपये किमंतीची लोखंडी तिजोरी असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास चालू आहे.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-९, श्री. राज तिलक रौशन, स.पो.आ. श्री. सुर्यकांत बांगर, व. पो.नि. जयवंत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली अंबोली पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण अधिकारी स. पो.नि. श्री. हरिभाऊ बिरादार, पो.उ.नि. श्री. पाटील, दा.नौ.नगर पोलीस ठाणेचे स.पो.नि. श्री. घाडगे आणि गुन्हे प्रकटीकरण पथकातील पो.ह. श्री.विलास दुलम, पो.ह. श्री. रमेश पाटील, पो.ह. श्री.गोरख पवार, पो.ह. श्री. प्रदिप कुलट, पो.ह. श्री. शिल्पेश कदम, पो.शि. श्री.शिवाजी कासार, पो.शि. श्री. सुनिल घुगे, पो.शि. श्री.निखिल बाबर, पो.शि. श्री.संदिप सांगळे, पो.शि. श्री.गणेश मेश्राम यांनी सदरची कामगिरी पार पाडली आहे.

-------००--------